राज्यातील अकृषी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

शासन निर्णय क्रमांकः नियुक्ती २०११/ प्रक्र ३४४ /११/ मशि ५

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक : १५ मार्च, २०१२

वाचा : १) शासन निर्णय क्र नियुक्ती २०१०/ प्रक्र ३३७/२०१०/मशि-५, दि. २३/०८/२०१०

२) शासन निर्णय क्र नियुक्ती २०११/ प्रक्र ३४४/२०११/ मशि ५, दि. १३/१०/२०११

<u>प्रास्तावना</u>: राज्यातील अकृषी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्याबाबतच्या दि.१३/१०/२०११ च्या शासननिर्णयात पीएच.डी., पदव्युत्तर स्तरावर किमान ५०% गुण व १५ वर्षाचा अनुभव या अटी अनिवार्य केल्या आहेत. त्यात अनुभवाची अट ३ वर्षांनी शिथिल करण्याचीही तरतूद करण्यात आली आहे. तथापि, असे अर्हताधारक अध्यापक अतिरिक्त कार्यभार देण्यासाठी कांही ठिकाणी उपलब्ध होत नसल्याने कर्मचाऱ्यांची वेतनदेयके सादर करणे इ. बाबी होवू शकत नसल्याने गंभीर प्रशासकीय अडचणी निर्माण होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली. दरम्यान जयहिंद महाविद्यालय, मुंबई येथिल प्रभारी प्राचार्यांच्या नियुक्तीस मुंबई विद्यापीठाने मान्यता दिली नसल्याने सिंध एज्युकेशनिस्ट्स असोसिएशन व जय हिंद महाविद्यालय यांनी रिट पिटिशन (एल.जी.) नं ७६/२०१२ दाखल केली. सदरहु याचिकेवर मा. उच्च न्यायालयाने दि. २१/०२/२०१२ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिल आहेत. "अल्पसंख्यांक समाजातर्फे चालविल्या जाणाऱ्या शिक्षण संस्थांना, नियमित प्राचार्यांची रीतसर नेमणुक होईपर्यत विहित अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीस प्रभारी प्राचार्य म्हणुन नेमण्याचे पुर्ण स्वातंत्र्य आहे." यामध्ये न्यायनिर्णय देत असताना न्यायालयाने गुणवत्तेचा मुद्दा तसाच अबाधित ठेवलेला आहे.

**<u>शासन निर्णय</u> :-**

प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यासाठी अर्हताधारक अध्यापक उपलब्ध नाहीत या कारणास्तव कर्मचाऱ्यांच्या वेतनदेयके सादर न होणे, इ. सारख्या गंभीर प्रशासकीय अडचणी निर्माण होत असल्याची बाब त्याचप्रमाणे जयहिंद महाविद्यालय, मुंबई यांनी दाखल केलेल्या याचिकेमध्ये उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय आणि तो निर्णय देत असताना न्यायालयाने गुणवत्ता अबाधित ठेवलेला मुद्दा या सर्वांचा विचार करुन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

१) महाविद्यालयामध्ये जे प्राचार्य पदासाठी अर्हताधारक अध्यापक असतील तर त्यांनाच प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात यावा.

२) महाविद्यालयात अर्हताधारक अध्यापकच नसतील तर त्या परिस्थितीत जेष्ठतम अध्यापकास प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात यावा.

३) असा अतिरिक्त कार्यभार जास्तीत जास्त केवळ एक वर्षासाठी दिला जावा. दरम्यानच्या कालावधीत महाविद्यालयाने / संस्थेने नियमित प्राचार्य पद भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

हा शासननिर्णय शासनाच्या WWW.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक क्र २०१२०३१५१२०४१५३१५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सदाशिव शिवदास)
महाराष्ट्र शासनाचे सह सचिव

प्रत::

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. सर्व कुलगुरु, अकृषी विद्यापीठे.
३. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
४. मा. उप मुख्य मंत्री यांचे प्रधान सचिव
५. मा. मंत्री (उ व तं शि ) यांचे खाजगी सचिव.
६. मा. राज्य मंत्री (उ व तं शि ) यांचे खाजगी सचिव.
७. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण,
९. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता ) / (लेखापरीक्षा), महाराष्ट्र १, मुंबई
१०. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता ) / (लेखापरीक्षा), महाराष्ट्र २, नागपूर
११. जिल्हा कोषागार अधिकारी,
१२. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व विशि व मशि कार्यासने
१३. निवड नस्ती -मशि-५